# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई
## गुन्हे शाखा कक्ष १
## प्रेसनोट

**2022**

गुन्हे शाखा, नवी मुंबई                                   दिनांक  ०४.०६.२०२२

**सानपाडा पोलीस ठाणे हददीत दिवसा घरफोडी करुन दागिने व रोख रक्कम चोरुन नेणा-या सराईत गुन्हेगारास कक्ष-१, गुन्हे शाखा पोलीसांकडून अटक. आरोपीकडून दिवसा घरफोडीचे एकुण ०८ गुन्हे उघडकीस आणून १०,४१,९००/-रु कि. चे ३४.७० तोळे वजनाचे सोन्याचे दागिने तसेच ७,९०,०००/- रु कि. चे एक मारुती सुझुकी डिजायर कार तसेच दोन महागडे मोबाईल फोन असा एकुण १८,३१,९००/-रु किमंतीचा मुददेमाल हस्तगत**

---

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात सानपाडा पोलीस ठाणे हददीत दि. २२/०४/२०२२ रोजी सकाळी १०:२० ते ११.४५ वा. चे दरम्यान सेक्टर ५,सानपाडा,नवी मुंबई येथे दिवसा घरफोडीचा गुन्हा घडला होता. गुन्हयातील फिर्यादी हे घराला लॉक लावून कामानिमित्त बाहेर गेले असता अज्ञात चोरटयांनी घराचा कडी-कोयंडा तोडून ५५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, एक कॅनान कपंनीचा कॅमेरा व रोख रक्कम असा एकुण १,६४,०००/-रु एकुंण किमंतीचा मुददेमाल घरफोडी चोरी करुन नेला होता. सदरबाबत सानपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ६२/२०२२ भादवि कलम ४५४,३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत **मा. पोलीस आयुक्त श्री.बिपीनकुमार सिंह सो, मा. पोलीस सह आयुक्त, डॉ. श्री जय जाधव सो, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. महेश घुर्ये सो, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री सुरेश मेंगडे, मा.सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. विनायक वस्त, नवी मुंबई यांनी तपासा संबंधी मार्गदर्शक सूचना दिल्या.** त्याप्रमाणे कक्ष-१ गुन्हे शाखेचे वपोनि. सुनिल शिंदे, सपोनि. निलेश पाटील तसेच **,पोकॉ/ ३०७७ उत्तरेश्वर जाधव, पोकॉ/ ३८४३ विशाल सावरकर पोकॉ/ ४४४४ आशिष जाधव , पोकॉ/ ४४४६ अश्विन ठाकूर पोकॉ/ २३९४ राकेश भोईर** यांचे तपास पथकाने आरोपी येण्या-जाण्याच्या मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपी हा जुईनगर रेल्वे स्टेशन येथे गेल्याचे सीसीटीव्ही फुटेजद्वारे समजले. त्यानंतर गुन्हयाचे घटनास्थळाजवळील व जुईनगर रेल्वे स्टेशन येथील डम्पडाटा घेवून तांत्रिक विश्लेषण करुन आरोपीची सोशल मिडीयाद्वारे माहिती मिळवली असता सदर गुन्हयातील आरोपी हा गजानन अर्जुन पाटील वय-२८ वर्षे अशोकानगर, खराडी,पुणे असे असल्याचे निष्पन्न केले. त्यानंतर सपोनि. निलेश पाटील, पोकॉ/ ३८४३ विशाल सावरकर, पोकॉ/ ३०७७ उत्तरेश्वर जाधव, पोकॉ/ ४४४४ आशिष जाधव असे पुणे येथे तपासकामी रवाना होवून पाहीजे आरोपीचा खराडी, पुणे परिसरात शोध घेत असताना पाहीजे आरोपी हा मारुती सुझुकी स्वीप्ट डिजायर कार मधुन जात असताना मिळून आल्याने त्यास सापळा रचून शिताफीने ताब्यात घेवुन त्यास दिनांक ०१/०५/२०२२ रोजी अटक केली.

Scanned with CamScanner

पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

अटक आरोपीताची मा. न्यायालयाकडुन ०८ दिवस पोलीस कस्टडी रिमांड प्राप्त करुन आरोपीताकडे सखोल तपास केला असता आरोपीने अशाच प्रकारे आणखी ०७ गुन्हे केल्याचे निष्पन्न करून अटक आरोपी याने नमूद गुन्हयातील चोरी केलेले सोन्याचे दागिने हे पुणे येथील एका ज्वेलर्स दुकानदाराकडे वेगवेगळे बहाणे सांगून गहाण ठेवल्याचे सांगितले. त्याप्रमाणे आरोपीने दिलेल्या माहितीप्रमाणे एकुण १०,४१,९००/-रु कि. चे ३४.७० तोळे वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत केले. तसेच अटक आरोपी याचे अंगझडतीत ७,९०,०००/- रु कि. ची एक मारुती सुझुकी डिजायर कार क्रमांक MH12/SU/1961 व एक ॲपल कपंनीचा मोबाईल व एक ओप्पो कपंनीचा मोबाईल असा एकुण १८,३१,९००/-रु किमंतीचा मुददेमाल हस्तगत केला.

- अटक आरोपीचे नाव:- गजानन अर्जुन पाटील वय-२८ वर्षे धंदा-मार्केटींग,रा.रुम नं ४११, डाउनटाउन झेनिया,अशोकानगर, खराडी,पुणे

- उघडकीस आणलेले गुन्हे -

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय
१) सानपाडा पो. ठाणे गु.र.नं. ६२/२०२२ भादवि कलम ४५४,३८०
२) सानपाडा पो. ठाणे गु.र.नं. १८/२०२२ भादवि कलम ४५४,३८०
३) पनवेल शहर पो. ठाणे गु.र.नं. १०५/२०२२ भादवि कलम ३८०
४) पनवेल शहर पो. ठाणे गु.र.नं. २१३/२०२२ भादवि कलम ४५४,३८०

पुणे शहर पोलीस आयुक्तालय
५) दिघी पो. ठाणे. पुणे गु.र.नं. ४०५/२०२१ भादवि कलम ४५४,३८०
६)विश्रांतवाडी पो. ठाणे. पुणे गु.र.नं. १६८/२०२१ भादवि कलम ४५४,३८०
७)हडपसर पो. ठाणे. पुणे गु.र.नं. २५९/२०२२ भादवि कलम ४५४,३८०

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय
८) आळंदी पो. ठाणे, पिंपरी चिंचवड गु.र.नं. १४९/२०२२ भादवि कलम ४५४,३८०

- हस्तगत मालमत्ता :-

१) १०,४१,९००/-रु कि. चे ३४.७०तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व एक कॅनान कपंनीचा कॅमेरा
२) ७,००,०००/- रु एक मारुती सुझुकी डिजायर कार क्रमांक MH12/SU/1961
३) ६०,००० /-रु कि. चा एक ॲप्पल कपंनीचा पांढ-या रंगाचा आयफोन ११ मोबाईल
४) ३०,००० /-रु कि. चा एक ओप्पो कंपनीचा काळया रंगाचा रेनो ४ मोबाईल
५) ००.००/-रु कि. गुन्हयात वापर केलेली एक लोखंडी पक्कड
-----------------
१८,३१,९००/- रु एकुण

- अटक आरोपीतांची गुन्हेगारी पार्श्वभूमी-

१) चंदननगर पो. ठाणे, पुणे शहर गु.र.नं. ३५५/२०१८ भादवि कलम ४५४,४५७,३८०
२) चंदननगर पो. ठाणे, पुणे शहर गु.र.नं. ६७/२०२१ भादवि कलम ३७६,३२३,५०४

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner